सालोड ल. पा. योजना. ता. जि. यवतमाळ
योजनेस द्वितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

# विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर

**महामंडळ निर्णय क्रमांक: २९६ /विपाविम/कातां ३(१)/ (धा.क्र.१९/१७)/ सालोड लपायो / द्वितीय सुप्रमा / २०१९, दि. १६/०१/२०१९**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र २२९८/(१४७/९८)/लपा-२, दि.१४.०६.९७
२. शासन निर्णय क्र २२०५/(१०/२००५)/लपा-२, दि.३१.०३.२००५
३. शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१५/(३५/२०१५)/जसं(आ), दि. ०९.०९.२०१५.
४. राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती, नासिक यांचे पत्र. क्र. रातांसस(१)/कक्ष १/ धा.क्र.१०१/२०१७)/९७६/२०१८ दि. २४.१०.२०१८.
५. दि.३१.०१.१९ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त क्र. बैठक-२०१९/(७५/२०१९)/लपा, दि. १५.०२.२०१९
६. वि.पा.वि.म. नियामक मंडळाचे दि. १२.०२.२०१९ रोजी संपन्न ७३ व्या बैठकीतील ठराव क्र. ७३/६

प्रस्तावना :

सालोड लघु पाटबंधारे योजना, हा प्रकल्प यवतमाळ जिल्ह्याचा यवतमाळ तालुक्यातील सालोड गावठाणापासुन १.५० कि.मी. अंतरावर स्थानिक नाल्यावर प्रस्तावित आहे. सदर प्रकल्पाद्वारे यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ तालुक्यातील ५ गावातील २९७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. सदर प्रकल्प आत्महत्याग्रस्त असलेल्या यवतमाळ जिल्ह्यातील आहे.

सालोड लघु पाटबंधारे योजनेस संदर्भ क्र. १ नुसार सन १९९८-९९ चे दरसुचीवर आधारीत रू. २.१० कोटी (रू. दोन कोटी, दहा लक्ष फक्त) इतक्या रकमेस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच संदर्भ २ नुसार सन २००३-०४ चे दरसुचीवर आधारीत रू. ५.८० कोटी (रू. पाच कोटी, ऐंशी लक्ष फक्त) इतक्या रकमेस प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती.

बांधकामाचे दरम्यान योजनेच्या खर्चात, दरसुचीतील बदलामुळे झालेली वाढ, जास्त दराच्या निविदा स्विकृतीमुळे भूसंपादन खर्चातील वाढ, , अपु-या तरतुदी, इतर कारणे व अनुषंगीक खर्च इत्यादी कारणांमुळे वाढ झाली असून योजनेची अद्यावत किंमत प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता किंमतीच्या दहा टक्क्याहून अधिक वाढत असल्यामुळे व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करणे आवश्यक झाले आहे.

सालोड लघु पाटबंधारे योजनेचा द्वितीय सुप्रमा प्रस्तावातबावत महामंडळाने तयार केलेल्या छाननी अहवालाचा (Vetting) अहवाल राज्यस्तरीय तांत्रीक सल्लागार समिती(१), नाशिक, यांचे दि. ०५.१०.२०१८ रोजीच्या १२२ व्या बैठकीत अंतिम करण्यात आला असून पुढील कार्यवाहीस्तव संदर्भिय पत्र क्र. ४ नुसार प्राप्त झालेला आहे.

सालोड लघु पाटबंधारे योजनेच्या व्दितीय सुप्रमा प्रस्तावावर अतिरीक्त दि.३१.०१.२०१९ रोजी झालेल्या मा. सचिव उपसमितीचे बैठकीत चर्चा होवून प्रस्ताव नियामक मंडळासमोर पुढील निर्णयार्थ सादर करण्यास सहमती दर्शविण्यात आली आहे.

संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयानुसार विदर्भातील प्रकल्पांना सु.प्र.मा. देण्याचे अधिकार महामंडळास प्रदान करण्यात आलेले आहेत.

दि. १२.०२.२०१९ रोजी झालेल्या नियामक मंडळाचे ७३ व्या बैठकीतील ठराव क्र. ७३/६ नुसार सालोड लघु पाटबंधारे योजनेच्या रू. १३.०७ कोटी अंदाजित किंमतीच्या व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्तावास मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालनाचे अधीन राहून मान्यता दिली असून या बाबतचे आदेश कार्यकारी संचालक यांनी निर्गमित करण्याकरिता नियामक मंडळाने मान्यता प्रदान केलेली आहे.

मंजूर प्रथम सुप्रमा किंमतीच्या तुलनेत द्वितीय सुप्रमा अहवालानुसारा प्रकल्प किंमतीतील वाढ रु.७.२७ कोटी म्हणजेच १२५.३५ % इतकी आहे. किंमत वाढीची प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ.क्र. | बाब | वाढ रू (कोटी) | मंजुर प्रथम सुप्रमा किंमतीच्या तुलनेत वाढीची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | दरसुचीतील बदलामुळे | १.२१ | २०.८६% |
| २ | जास्त दराची निविदा स्विकतीमुळे | ०.३४ | ५.८६% |
| ३ | भूसंपादनाच्या किंमतीतील वाढ | ५.२९ | ९१.२१% |
| ४ | अपु-या तरतुदींमुळे वाढ | ०.७४ | १२.७६% |
| ५ | इतर कारणांमुळे झालेली वाढ | -०.०१ | -०.१७% |
| ६ | अनुषंगीक खर्च वाढ | -०.३० | -५.१७% |
| | एकुण | ७.२७ | १२५.३५% |

**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचा निर्णय :**

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आता या निर्णयान्वये यवतमाळ जिल्ह्यातील सालोड लघु पाटबंधारे योजना, ता. यवतमाळ जि. यवतमाळ या योजनेच्या एकूण अंदाजीत किंमतीस रू. १३.०७ कोटी (रू. तेरा कोटी, सात लक्ष फक्त) व्दितीय सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करीत आहे. त्यापैकी रू. १२.५९ कोटी (रू. बारा कोटी एकोणसाठ लक्ष फक्त) कामाप्रित्यर्थ व रू. ०.४८ कोटी (रू. अठ्येचाळीस लक्ष फक्त) अनुषंगीक खर्च आहे. अंदाजपत्रकात उर्वरीत कामांसाठी जलसंपदा विभागाची सन २०१३-१४ या वर्षाच्या दरसूचीप्रमाणे दर वापरण्यात आले आहेत. उपशिर्षवार तरतुदींचा गोषवारा परिशिष्ट-१ मध्ये संलग्न आहे.

१. ठळक बाबी –

| | |
|---|---|
| **अ) योजनेचे सिंचन क्षेत्र** | **- २९७ हेक्टर** |
| **ब) योजनेमुळे एकुण होणारा पाणीसाठा** | **- २.०५३ द.ल.घ.मी. (२०५३ स.घ.मी.)** |
| **क) प्रति स.घ.मी. पाणीसाठा किंमत** | **- रू. ६३७०६/-(मापदंड रू.९५,७९०)** |
| **ड) योजनेचे लाभव्यय गुणोत्तर** | **- १.०८ (मापदंड १.०० पेक्षा जास्त)** |

२. या योजनेच्या कामावरील खर्च मागणी क्र.आय -५, मुख्य लेखाशिर्ष "४७०२", लघु पाटबंधारे यावरील भांडवली खर्च, (८०)- सर्वसाधारण. (१९०)-सार्वजनिक क्षेत्रातील व इतर उपक्रमातील गुंतवणुका (००) (०५), विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ भाग भांडवली अंशदान (४७०२ ५१०-१) या लेखाशीर्षाखाली खर्ची घालावा व विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मंजुर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. या योजनेस प्रदान केलेली व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता ( २२/२०१९) या अनुक्रमांकावर नोंदविण्यात आली आहे.

४. सदर व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

४.१) सदर सुधारित प्रशासकीय मान्यता म्हणजे प्रकल्प कार्यान्वयीन करण्याच्या विविध टप्प्यावर झालेल्या अनियमिततेस मान्यता गृहीत धरता येणार नाही.

४.२) या प्रकल्पाबाबत चालू असलेल्या अथवा प्रस्तावित विभागीय चौकशी कार्यवाही पूढे चालू ठेवावी. व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याच्या निर्ण यामुळे विभागीय चौकशीच्या कार्यवाहीस कोणतीही बाधा पोहचणार नाही.

४.३) आर्थिक दायित्व निर्माण होईल अशा नवीन घटकांचा शासन मान्यतेशिवाय समावेश करण्यात येऊ नये.

४.४) प्रगतीपथावरील निविदांची कामे प्राधान्याने पूर्ण करण्यात यावीत. पाणीसाठ्याचा सिंचनाकरीता जास्तीतजास्त लाभ होईल अशा प्रकारे उर्वरित कामांचा प्राधान्यक्रम निश्चित करण्यात यावा व त्यानुसार कामे/निविदा प्रक्रिया करण्यात यावी.

४.५) सदर प्रकल्पासाठी कोणत्याही प्रयोजनार्थ मंजूर व्दितीय सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या मर्यादेबाहेर जाऊन निधी वितरण अथवा अतिरीक्त खर्च करता येणार नाही. या संदर्भात प्रचलित शासन निर्णय, वित्त अधिकार मर्यादा, विहित केलेली निविदा कार्यपध्दती यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

४.६) राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीच्या मुल्यार्पणअहवालात नमुद मुद्दा क्र. १ ते ६ मधील अभिप्रायाचे अनुपालन करण्यात यावे.

४.७) मा. सचिव उपसमितीने उपस्थित केलेल्या मुद्यांचे अनुपालन करण्यात यावे.

४.८) प्रकल्पाचे काम नियोजना नुसार पूर्ण करण्यात यावे.

५. सदर महामंडळ निर्णयाची अंमलबजावणी निर्गमित दिनांकापासून करण्यात यावी.

६. सदर निर्णय जलसंपदा विभागाचे wrd.maharashtra.gov.in या संकेतस्थळा वरील विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे Mini Web Portal वर उपलब्ध करण्यात आला आहे.

विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे अध्यक्ष यांचे आदेशानुसार व नावाने.

**"मुळ प्रत मा.कार्यकारी संचालक यांना मान्य"**

**अधीक्षक अभियंता**
विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,
नागपूर

**प्रत सहपत्रासह,**

१. स्वीय सहाय्यक, मा. मंत्री, जलसंपदा, मंत्रालय, मुंबई.-३२
२. प्रधान सचिव (जसं प्र व वि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
३. सचिव (जसंव्य व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई -३२
४. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर.
५. महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा), नागपूर.
६. वित्त विभाग, (व्यय-१२) मंत्रालय, मुंबई -३२
७. नियोजन विभाग, (कार्यासन १४३४), मंत्रालय, मुंबई -३२
८. विभागीय आयुक्त, अमरावती प्रदेश, अमरावती.
९. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, अमरावती.
१०. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, महामंडळ कार्यालय, नागपूर.
११. जिल्हाधिकारी, यवतमाळ
१२. अधीक्षक अभियंता, यवतमाळ पाटबंधारे प्रकल्प मंडळ, यवतमाळ.
१३. कार्यकारी अभियंता, यवतमाळ प्रकल्प बांधकाम विभाग, यवतमाळ .
१४. विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क संचालनालय, अमरावती
१५. कातां ७, संग्रहार्थ.
१६. चित्र शाखा १, संग्रहार्थ.

सालोड ल.पा. योजना प्रकल्प,
ता. जि. यवतमाळ
या योजनेस द्वितीय सुधारित प्रशासकीय
मान्यता देण्याबाबत.

२१६

**महामंडळाचा निर्णय क्रमांक** :विपाविम/कातां.३(१)/(धा.क्र. १९/१७)/ सालोड ल.पा.प्रकल्प/२०१९

दिनांक : १६/०९/२०१९

**परिशिष्ट - १**

**सालोड ल.पा.प्रकल्प,**

**ता. यवतमाळ जि. यवतमाळ**

**उपशिर्षवार तरतूदी.**

किंमत रु.कोटी

| अ. क्र. | उपशीर्ष | रक्कम | | तरतूद एकूण रुपये |
|---|---|---|---|---|
| | | शिर्ष कामे | मुख्य कालवा | |
| १ | "ए" प्राथमिक कामे | ०.०२ | ०.०४ | ०.०६ |
| २ | "बी" जमीन | ३.६६ | ४.१२० | ७.७८ |
| ३ | "सी" मुख्य कामे | २.१६ | ० | २.१६ |
| ४ | "डी" विमोचक | ०.१९ | ०.०९ | ०.२८ |
| ५ | ई-प्रपात | ०.०० | ०.०२ | ०.०२ |
| ६ | "एफ"-RHT Works | ०.०० | ०.३५ | ०.३५ |
| ७ | "जी"-पूल | ०.०० | ०.१७ | ०.१७ |
| ८ | "एच"-एस्केप | ०.०० | ०.०३ | ०.०३ |
| ९ | "के" ईमारत | ०.०३ | ०.०० | ०.०३ |
| १० | "एल" - मातीकाम | ०.०० | १.६४ | १.६४ |
| ११ | "एम" वृक्षारोपण | ०.०१ | ०.०० | ०.०१ |
| १२ | "ओ" संकीर्ण | ०.०१ | ०.०१ | ०.०२ |
| १३ | "पी" देखभाल | ०.०१ | ०.०१ | ०.०२ |
| १४ | "आर" दळणवळण | ०.०२ | ० | ०.०२ |
| | **एकूण कामाप्रित्यर्थ किंमत** | **६.११** | **६.४८** | **१२.५९** |
| | **अनुषंगिक खर्च** | **०.४८** | | **०.४८** |
| | **योजनेची एकूण किंमत** | | | **१३.०७** |

**"मुळ प्रत मा.कार्यकारी संचालक यांना मान्य"**

**अधीक्षक अभियंता**
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ,**
**नागपूर**

\\Sanjiv\d\vidc41\TECH - 18\KT-3(1)\SALOD dt. 06.03.19सालोड